ijindex

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

ijindex
digital directory of Indian journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

144

# अनुक्रमनिका


डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचारांचे ऐतिहासिक योगदान — 1
**प्रा. के. एस. बन**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री-विषयक भुमिका — 3
**प्रा.डॉ भानुसे कारभारी लक्ष्मण**

कृषी क्षेत्रातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक अभ्यास — 6
**प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महारेतरांचे धर्मांतर — 9
डॉ. मोरे डि. ए.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक आर्थिक विचार — 14
**प्रा.आबासाहेब माणिकराव देशमुख**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ — 18
**प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि कार्य — 22
**प्रा.डॉ.अब्दुलसमद बादशहा शेख**

डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर : एक दृष्टीक्षेप — 24
**प्रा. सतीश निकम**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्तुंग व्यक्तिमत्व — 27
**प्रा.डॉ.अशोक गंगाराम साबणे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जलविषयक विचार — 30
**प्रा.डॉ.भालेराव युलिसिस एकनाथ**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार — 33
**प्रा.संतोष दारकुंडे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदूकोड बील व स्त्री- सुधारणा — 38
**प्रा. पालवे रामनाथ सुर्यभान**

आर्थिक विचारांचा इतिहास : डॉ. बाबासाहेब आंबेडकर — 42
**प्रा.डॉ. फेरोज कदिर देशमुख**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर : यांचे कार्य
अंबादास शामराव रगडे 93

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राश्ट्रीय सुरक्षा व परराश्ट्रीय धोरणविशयक विचार
प्रा. डॉ. बी. डी. तोडकर प्रा. रामकिषन आवाड 96

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री
**प्रा.रविंद्र गोविंदरात पाटील** 99

डॉ बाबासाहेब अंबेडकरांची जलनिती व सिंचन विषयक कार्य
प्रा. डॉ. दत्ता पिलाप्पा हिंगमिरे 102

विषय : डॉं. बाबासाहेब आंबेडकरांची विचारसरणी आणि त्याचा आधुनिक भारतावरील परिणाम
**डॉं. बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलित चळवळ प्रा. राहुल चोखाजी साळवे** 106

डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे आर्थिक विचार
**प्रा.सचिन रमेश साळवे** 109

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार**
**प्रा.डॉ.सावंत के.डी.** 111

अंबेडकर के सपनों का समाज निर्माणः पंचायती राज व्यवस्था में दलित महिलाओं का प्रतिनिधित्व
**स्मिता मुरलीधर भगत** 114

स्त्री उद्धाराचे महान पर्व : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
**डॉ. सुवर्णा भाऊसाहेब पाटील** 118

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार
**प्रा.डॉ. गोपालसिंह बी. बच्छिरे विजय साहेबराव साळवे** 121

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सत्याग्रहाच्या मार्गाने मानवाधिकाराची पेरणी
**डॉ. गोपालसिंह बछिरे** 125

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतष्त्वाखालील दलित चळवळ
प्रा.निल नागभिडे 129

बौध्द धम्म चळवळीत अनागारिक धम्मपाल यांचे योगदान
**बाळु साहेबराव हिवाळे** 132

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शौक्षणिक विचार
डॉ.गट्टी जी.व्ही. 135

कन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार

प्रा.डॉ.सावंत के.डी.

प्रस्तावना :

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये ज्या काही महान व्यक्ती होवून गेल्या त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक होत. त्यांनी आयुष्यात अस्पृश्य, वंचित, शेतकरी, स्त्रिया या घटकांसाठी कार्य केले व या घटकांना जीवनाच्या प्रवाहात आणले. कार्लाइलने म्हटल्याप्रमाणे, 'महापुरुषांचे चरित्र हे अर्धा इतिहास असतो.१'इतिहासाच्या शास्त्रीय अभ्यासामध्ये महापुरुषांच्या चरित्र व कार्यास विशेष महत्व असते. कारण इतिहास अशा महापुरुषांच्या कर्तत्वशाली योगदानामुळे बनत असतो. असा इतिहास घडविताना आपल्या मुत्सदीपनाने आणि ध्येयवादाने नवी मांडणी करतात व कालचक्रावर स्वतःचा ठसा उमटवितात. अशाच महापुरुषांच्या यादीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन व कार्याचे साध अवलोकन जरी केलं तरी ते विविध गुणांनी परिपूर्ण आणि जीवनातील सर्व अंगानी फुटलेले आढळते. त्यांच्या जीवनकार्याच्या आणि तत्वज्ञानाचा अभ्यास करतो म्हटले तरी प्रत्येक विषयावर एक स्वतंत्र्य प्रबंध लिहिला जाऊ शकतो आणि तसे अनेक प्रबंध लिहिले गेले आहेत, लिहिले जात आहेत. त्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, घटनाविषयक, राजकीय, शेतीविषयक इत्यादी विषयांवर सखोल, अभ्यासपूर्ण संशोधनपर, विद्वत्ताप्रचूर लिखाण आणि विचार अभ्यासकांची मती गुंग करणारे आहेत. आयुष्यात एका माणसाला इतक्या वेगवेगळ्या विषयावर सखोल अभ्यास करणे आणि त्या विषयात प्राविण्य प्राप्त करणे हे महाकठीण किंवा अशक्य कोटीतील गोष्ट, बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात शक्य करून दाखविली.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः अस्पृश्य समाजात जन्मास आले. त्यामुळे त्यांना समाजातील तथाकथीत उच्चवर्णीयांचे जे भयावह अनुभव आले, त्यातून त्यांनी सामाजिक क्रांतीचा झेंडा स्वतःच्या खांदयावर घेतला. महात्मा जोतिराव फुलेनंतर सामाजिक परिस्थितील बदल घडवून आणण्याचे महान कार्य करत असताना त्यांनी भारतीय परंपरेचे पूर्ण भान ठेवले होते. त्यांच्या प्रत्येक कृतीतून आपल्या प्राचीन परंपरेविषयी तळमळ दिसून येते. तत्कालिन समाजाच्या हे लक्षात आले नसले, तरी आज त्याची प्रकर्षाने जाणीव होत आहे.२' आपण बाबासाहेबांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचारांत डोकावलो तर ही बाब प्रत्येकाच्या सहज लक्षात येण्याजोगी आहे. आज फुले-आंबेडकरांच्या विचारामुळे सामाजिक जीवनास वेगळी दिशा मिळाली आहे. हे कुणी निराळे सांगण्याची गरज नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे पुढारी होते असे मानणारे आज काही आहेत. परंतु असे समजणे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर अन्याय करण्यासारखे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले आर्थिक आणि सामाजिक विचार प्रकट करताना संपूर्ण समाजाचे भान ठेवले होते. सवर्णामधील लहान शेतक□यांची किंवा सवर्ण शेतमजुरांची स्थिती अस्पृश्यांपेक्षा काही वेगळी होती असे कधी डॉ. बाबासाहेबांना वाटले नाही. त्यामुळे त्यांनी सवर्णांतील श्रमिक वर्गास आणि लहान शेतकयास न्याय मिळावा म्हणून वेळोवेळी विचार प्रकट केले आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील शेतीविषयक विचार विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार :**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय लोकसंख्येच्या एक तृतीयांश लोकसंख्या पोसण्याची ऐपत भारतीय शेतीत आहे. परंतु शेती बहुसंख्य जनतेचे उपजीविकेचे साधन होऊ शकत नाही. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मत आहे. पुढे बाबासाहेब आंबेडकर शेती प्रश्नावर भाष्य करताना म्हणतात, 'शेतीचे लहान लहान तुकडे भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. उदाहणार्थ, मुंबई इलाख्यात सरासरी धारणक्षेत्र २५.९ एकर तर पुण्याशेजारच्या पिंपाला सौदागर येथे अवघे एक दोन एकर एवढेच धारण क्षेत्र आहे.३ यापेक्षा अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे, धारणक्षेत्रे लहान लहान तुकडयात विभागली गेली होती. उदाहरणार्थ, रत्नागिरी जिल्हातील अवघ्या वीस गुंठयाचे धारणक्षेत्र तीन तुकडयांत विभागलेले, तर ठाणे जिल्हातील एकर नऊ गुंठयाचे धारणक्षेत्र सहा तुकडयात विभागलेले सर्वात कळस म्हणजे सुरतमधील एक एकराचे धारणक्षेत्र चौदा तुकडयाचे मिळून झालेले होते.४ अशी असंख्य उदाहरणे देता येतील. मुळातच छोटे छोटे जमीनीचे तुकडे व त्यातही त्यांचे विखंडन यामुळे साधनसंपत्तीचा कार्यदक्षपणे उपयोग करण्यात अडचण निर्माण होऊन उत्पादनखर्च वाढतो ;व परिणामतः उत्पादकता कमी होते. अशाप्रकारे शेती हा सर्वात मोठा राष्ट्रीय व्यवसाय असल्यामुळे एकीकडे त्यावर सर्वाधिक लोक अवलंबुन तर दुसरीकडे शेतीची उत्पादकता कमी. फारच लहान धारणक्षेत्रे व त्यांचे विखंडण ही कमी उत्पादकतेची कारणे असल्याचे मानले गेल्यामुळे स्वाभाविकपणे धारणक्षेत्रांचा आकार वाढविणे (कदश्ङ्कद्धढ्ढश्चर्ढ्ढददय्) व तुकडेजोड हेच आपल्याला प्राथमिक उपाय वाटू लागतात.

भारतातील शेतीसमस्या सोडविण्यासाठी एक मार्ग म्हणुन डॉ. बाबासाहेबांनी सहकारी शेतीचाही पुरस्कार केलेला दिसतो. विखुरलेल्या व लहान धारणक्षेत्रांच्या या समस्येवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सहकारी शेतीचा उपाय सुचविला. ते म्हणतात, 'एका विशिष्ट आकारांची सहकारी शेते अस्तित्वात आणल्यास आपल्याला ॲन्डरसन यांच्या विधेयकात अभिप्रेत असलेली उद्दिष्टे साध्य करता येतील. मुख्य म्हणजे आपल्याला छोटया शेतकयांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल. सहकारी शेतीमुळे शेतकयांच्या जमिनीवरील मालकी हक्क अबाधित राहील. अर्थात लागून असलेल्या धारण क्षेत्राला / ना जोडल्याशिवाय त्याला आपले धारण क्षेत्र कसण्याची मुभा असणार नाही. अशा तरतूदीमुळे (सहकारी शेतीचे) लागवडीखाली एकूण जमीन प्रमाणित आकारमाना इतकी किंवा त्याहूनही जास्त होईल.' थोडक्यात त्यांच्या प्रतिपादनाचाच आशय असा होता की, 'सहकारी शेती असे मोठे आकारमानाचे असेल, तसेच ते एकसंधी असेल.' मुंबई इलाख्यात खोती पध्दतीमुळे भूधारकावर अन्याय होत असे. ही पध्दती रद्द होण्यासाठी बाबासाहेबांनी पुढाकार घेऊन विधेयक आणले व ती पध्दती रद्द केली. त्यामुळे भूधारकांना न्याय मिळाला. शासकीय समाजवादांचा बाबासाहेबांनी केलेला पुरस्कार हा त्यांच्या स्वतंत्र भारताच्या एकूणच सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेबाबतच्या भूमिकेचा अंतिम व शेवटचा टप्पा होय. त्यांच्यामते आर्थिक समता प्रस्थापित

झाली.तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल. त्यामुळे आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी समाजाच्या आर्थिक व्यवहारात ाासनाने हस्तक्षेप करणे अपरिहार्य होते. या भूमिकेतून त्यांनी ाासकीय समाजवादाचा एक भाग म्हणून 'सामुदायिक ोती' चे प्रतिपादनकेले ; कारण तसे झाल्यासच जमीनदार, कूळ व ोतमजूर हा भेद नष्ट होणार होता. उद्योगिकीकरण व सहकारी ोती याहीपेक्षा 'सामुदायिक ोती' हा दलित-अस्पृायाला न्याय देण्याचा अधिक व्यापक व परिणामकारक होता. शासकीय समाजवादाचा बाबासाहेबांनी केलेला पुरस्कार व तो कार्यान्वित करण्यासाठी सुचविलेला मार्ग म्हणजे स्वतंत्र्य आणि समता यावर आधारलेल्या लोकाााहीवरील त्या अनन्यसाधारण निष्ठेचा अविष्कार होय.

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ोतीविषयक विचार विाद करताना म्हणतात, 'भारतातील ोतीचे उद्योगिकीकरण वेगाने झाल्यास उपजीविकेचे पर्याय साधन उपलब्ध होवून अस्पृाय समाजाला शाहरात जाण्याची संधी प्राप्त होईल असे झाल्यास खेडयातील अस्पृायतेच्या दाहक चटक्यापासून काही प्रमाणात सुटका झाल्याची दिसते.' तसेच उद्योगीकरण उपाय असला तरी त्वरित घडून येण्याची ाक्यता नसल्यामुळे ोती समस्येवर उपाय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सहकारी ोतीचा मार्ग सुचविल्याचे दिसते. त्यांच्यामते विखुरलेल्या व 'लहान' धारणक्षेत्रांची समस्या सहकारी ोतीमुळे सोडविता आल्याचे दिसते. शोषित-उपेक्षित जनतेला न्याय मिळाला पाहिजे, ही भूमिकाच त्यांच्या समग्र जीवनाचे तत्वज्ञान होते. ोतात घाम गाळणाया कुळांच्या ाोषणावर आधारलेली व फक्त जमीनदारांना खोतांना उपकारक ठरलेली खोती पध्दती नष्ट केल्याची दिसते. त्यांनी ाासकीय समाजवादाचा एक भाग म्हणून 'सामुदायिक शोतीचे' प्रतिपादन केलेले दिसते.

**संदर्भसूची :**


१) गायकवाड, सरदेसाई, हानमाने, इतिहास लेखनशस्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१, पृष्ठ ३

२) गाडगीळ ध.रा., लेखसंग्रह, खंड-२, गोखले राज्याास्त्र व अर्थाास्त्र संस्था, सुलभा प्रकाान,पुणे, १९७४, पृष्ठ २८४

३) ॲनिहिलोान ऑफ कास्टट्ट, आंबेडकर बी. आर., रायटींग ॲन्ड स्पीचेस, गव्हनमेंट ऑफ महाराष्ट्र, एज्युकेशन डिपार्टमेंट, १९७९, खंड-१, पृष्ठ ४५७

४) किता, पृष्ठ ४५७

५) किता, पृष्ठ ४७४

६) किता, पृष्ठ ४७७



**प्रा.डॉ.सावंत के.डी.**

इतिहास विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, गेवराई